दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक १०१ वा रविवार दि.२२ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## मसला, तांदूळजा येथे महिला मेळावा श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी साधला संवाद महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी सहकार्य करु

**विकासाचा वेग कायम ठेवण्यासाठी आशिर्वाद द्यावा लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार धिरज देशमुख यांनी गेल्या पाच वर्षांत मतदारसंघात विविध विकास कामांच्या योजना आणुन मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केला.नवनवीन योजनांच्या माध्यमातून मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलला.विकास कामांचा वेग कायम ठेवण्यासाठी आगामी विधानसभा निवडणुकीतही आमदार धिरज देशमु यांना मतदारांनी आशिर्वाद द्यावा, असे यावेळी बोलताना रीड लातूरच्या संस्थापिका सौ.दीपशिखा देशमुख म्हणाल्या.**



लातूर : प्रतिनिधी महिलांनी विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केलेले आहे. घर, प्रपंच चालविण्यामध्ये महिलांचा सर्वाधिक वाटा असतो. महिला आता आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली पाहिजे. आर्थिक स्वावलंबनामुळे महिलांचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होते.त्यामुळे महिलांनी स्वत:च्या पायावर उभे राहात आर्थिक स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करावा त्यासाठी आवश्यक ते सहकार्य करु, अशी ग्वाही विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी दिली.

लातूर तालुक्यातील मसला व तांदूळजा येथे दि. २१ संप्टेंबर रोजी महिला बचत गटाच्या मेळाव्याचे आयोजन केरण्यात आले होते. त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांना संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या अध्यक्षा सौ. दीपशिखा धीरज देशमुख, सुनिता अरळीकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, मांजरा साखर कारख्याचे माजी संचालक मदन भिसे, अश्वीन स्वामी, शिवाजी बावणे यांची प्रमुख उपस्थिती होती.


पुढे बोलतांना श्रीमती वैशालीताई विलासराव देशमूख म्हणाल्या की, काँग्रेस पक्षाने महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये सक्षम करण्यासाठी असंख्य योजना, धोरणे राबविली आहेत. एकुण लोकसंख्येच्या ५० टक्के महिला असल्याने या महिलांना राजकीय क्षेत्रात संधी मिळावी म्हणून काँग्रेस पक्षाने सर्वप्रथम महिलांना राजकीय आरक्षण देण्याचे धोरण राबविले. त्यामुळेच आज महिला ग्रामपंचायतीच्या सरपंचपदापासून ते संसदेच्या सभापतीपर्यंत पोहोचल्या आहेत.महिलांनी विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केलेले आहे.आर्थिक क्षेत्रात महिलांनी स्वावलंबी होण्याची गरज असून त्यासाठी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून महिला बचत गटांना आवश्यक सहकार्य करु, असे आश्वासन त्यांनी दिले.

येत्या काही दिवसांत विधानसभा निवडुकीची रणधुमाळी सुरु होईल. त्यानिमित्ताने भाजपा महायुतीकडून पुन्हा दिशाभूल करणारी जाहिरात आणि खोटी आश्वासने दिली जातील. मतदारांनी खास करुन महिला भगिणींनी त्यांच्या भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन करुन श्रीमती वैशालीताई देशमुख पुढे म्हणाल्या, धिरज देशमुख यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून या मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केला.पाणी, वीज, रस्ते, आरोग्य सुविधा निर्माण केल्या आहेत. विविध योजनांतून विकास कामांसाठी मोठ्याप्रमाणात निधी खेचून आणला. विकासाची ही प्रक्रिया कायम राहण्याकरीता मतदारांनी आमदार धिरज देशमुख यांच्या पाठीशी आपला आशिर्वाद द्यावा, असेही त्या म्हणाल्या.

याप्रसंगी नरेंद्र आलटे, अक्षता शिंदे, अश्वीनी स्वामी, शरयु गायकवाड, नानासाहेब गायकवाड, वनिता बावणे, शोभा चव्हाण, रेखा कदम, दिपाली पावार, जयश्री देयमुख, सुनिता ओव्हाळ, अक्षता भगत, प्रियंका सांळुके, मंदाकिनी कदम, प्रियंका घोडके, प्राची शिंदे, जयश्री पोळ, श्रुती पालकर, अंजली नरवडे, जिवीका देवकते आदी महिला उपस्थित होत्या.

## राज्यात वाचाळवीर तयार झालेत

मुंबई : धारावीमधील मशिदीचा अवैध भाग तोडण्यासाठी महापालिकेचे पथक शनिवारी धारावीत गेले होते. यावेळी पालिकेच्या पथकाला तेथील नागरिकांनी कारवाई करण्यापासून रोखले असून पालिकेच्या वाहनांवर दगडफेक देखील केल्याचे समोर आले होते.



धारावीमध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. या प्रकरणाविषयी सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला आहे. भाजपा सत्तेत असल्यावरच राज्यात वाचाळवीर तयार होतात, अशी टीका राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे यांनी केली आहे. दरम्यान, धारावीच्या परिसरामध्ये एक मशीद आहे. या मिशिदीचा काही भाग अवैध असल्याचे सांगितले जात होते. त्या मशिदीचा अवैध भाग तोडण्यासाठी पालिकेचे पथक शनिवारी धारावीमध्ये पोहोचले होते. मशिदीवरील कारवाईमुळे धारावीमध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. या प्रकरणाविषयी सुप्रिया सुळे म्हणाल्या, ज्या पद्धतीने भारतीय जनता पक्षाचे नेते संविधानाच्या विरोधात बोलतात तसेच काहीही बोलून समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करतात, या राज्याचे गृहमंत्री त्यांची पाठराखण करतात हे खरंच दुर्दैवी आहे, असे म्हणत त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावला आहे. तसेच अजित पवार कोणाला तिकिट देणार हा त्यांचा अंतर्गत विषय आहे, असेही त्या म्हणाल्या आहेत.

## सर्व पक्षांनी एकसंघ होऊन मराठवाड्याच्या प्रश्नाला न्याय देण्यासाठी लढले पाहिजे - माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर/पिंपरी दि.२१-०९-२०२४ मराठवाड्यावरती निजामांनी २२४ वर्षे हुकूमशाही पध्दतीने राज्य चालविले. या कार्यकाळात निजामांनी जनतेचे शोषण, अन्याय, अत्याचार, व्याभिचार मोठ्या प्रमाणात केला. कासिम रझवीच्या रझाकार या संघटनेचे अतिरेक केला. या अन्यायाविरूध्द क्रांतीकारी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, देविसिंग चव्हाण, बाबासाहेब परांजपे, शेषरावजी वाघमारे या परिवर्तनवादी स्वतंत्र्य सैनिकांनी निजामांविरूध्द बंड उभारले. शेकडो लोकांनी आपले बलिदान दिले. या लढ्याला देशाचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी साथ देऊन १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा मुक्त झाला. प्रांतवार रचनेनुसार मराठवाडा महाराष्ट्रामध्ये बिनशर्त सामील झाला. लोकसंख्येच्या प्रमाणात शासकीय सेवेत नोकर्या व विभागाच्या विकासासाठी निधी जाहीर केला जाईल अशी घोषणा विधानसभागृहात केली, परंतु त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. यासाठी लोकप्रतिनिधींनी व सर्व पक्षांनी पक्ष विरहीत एकत्र येऊन मराठवाड्याला न्याय देण्यासाठी लढा दिला पाहिजे. असे अभ्यासू विचार माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी मराठवाडा स्वातंत्र्यदिनाच्या समारोहात मांडले.



यावेळी ते मराठवाडा जनविकास संघ व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ग.दी.गाडगुळकर नाट्यगृह, संभाजी चौक, प्राधिकरण निगडी, पिंपरी चिंचवड, पुणे येथे आयोजित मराठवाडा मुक्ती संग्राम महोत्सव -२०२४ कार्यक्रमात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द साहित्यिक डॉ.श्रीपाल सबनीस, खा.ओमराजे निंबाळकर, खा.श्रीरंगजी बारणे, खा.डॉ.शिवाजीराव काळगे, कार्यक्रम संयोजक अरुणराव पवार, उपाध्यक्ष प्रकाशराव इंगोले, प्रसिध्द व्याख्याते गंगाधर बनबरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, मराठवाड्याचा सन १९९५ मध्ये ४ हजार कोटीचा अनुशेष होता. त्यानंतर डॉ.केळकर समितीने साठ हजार कोटी असल्याचे जाहीर केले तर आजही तीन लाख कोटीचा अनुशेष रखडल्याचे सत्य समोर आले आहे. देशामध्ये आर्थिक अडचणीमुळे सर्वाधिक शेतकरी आत्महत्या मराठवाड्यात होत आहेत, हे थांबविण्यासाठी शेतकर्यांच्या मालाला एमएसपी देऊन त्याचे कायद्यात रूपांतर करावे, उजनीच्या धरणातून वाहून जाणारे २४ टीएमसी पाणी त्वरीत आणावे, मराठवाडा वॉटरग्रिड योजना राबवावी, उद्योगवाढीसाठी या विभागाला ईसीझेड योजना लागू करावी, लातूर हे शैक्षणिक हब असल्यामुळे विद्यापीठ उपकेंद्राला विद्यापीठ करावे, आयआयएम सारखे युनिट सुरू करावे व मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची सन २०२० मध्ये मुदत संपलेली आहे, त्याचे पुनर्जिवन त्वरीत करावे. याबरोबरच सिंचन, शिक्षण, कृषी, रस्ते व ग्रामीण विकास अशा विविध क्षेत्रातील अनुशेष भरून काढावा अशी अपेक्षाही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केले.

यावेळी या कार्यक्रमाला सहसचिव धनाजी येळकर, कोषाध्यक्ष शंकर तांबे, बाबासाहेब त्रिभूवन, नरेंद्र माने, ऋतुराज कदम पाटील, बळीराम माळी, सुवर्णा इंगोले, अनिताताई पांचाळ, जीवन बोर्हाडे, सचिन स्वामी, मनोज मोरे, अभिमन्यू पवार, युवराज माने, सूर्यकांत कुरूलकर, गोपाळ माळेकर, भिमाशंकर भोसले, अनुराधा पवार, शारदाताई मुंडे, बाळासाहेब साळुंके, विठ्ठल नवाने, अमोल लोंढे, दिनेश पांढरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मी शरद पवारांबरोबरच राहणार



जळगाव : गणपती विसर्जनानंतर माझा प्रवेश होईल असे देवेंद्र म्हटले होते, मात्र माझ्या दृष्टीने आता भाजप प्रवेश हा गणपती बाप्पा बरोबर विसर्जित झाला आहे असे म्हणत आमदार एकनाथ खडसे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात राहणार असल्याचे स्पष्ट केले. ते जळगावमध्ये पत्रकारांशी बोलत होते. जामनेर येथे आयोजित राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेच्या कार्यक्रमात एकनाथ खडसे यांनी उपस्थिती लावली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत एकनाथ खडसे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा जोरदार प्रचार करणार आहेत, हे स्पष्ट झाले आहे. एकनाथ खडसे म्हणाले, मी आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये स्थायी सदस्य आहे आणि यापुढेही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सक्रिय काम करणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत मी राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रचार करणार आहे. अनेक वेळा जामनेर तालुक्यात माझ्या सभा झालेल्या असून मोठा प्रतिसाद मिळतो आहे. ब-याच वर्षांनंतर या ठिकाणी जयंत पाटील आणि अमोल कोल्हे यांच्या उपस्थितीत सभा होत आहे. त्यामुळे या सभेविषयी उत्सुकता आहे की कोण काय बोलणारआज दिलीप खोडप यांच्यासह अनेक जण प्रवेश करणार आहेत. मंत्री सतीश पाटील म्हणाले, मागील काळात आमचे लोक फोडले होते. आता आम्ही त्यांचा माणूस फोडला आहे. राज्याचे संकट मोचक म्हणून ज्यांची ओळख आहे, त्यांच्यावर आता संकट आहे. खडसे यांना सोबत घेऊन काम करणार आहेत. चार दिवस पूर्वी गिरीश महाजन यांना तांड्यावर बोलावले होते,या ठिकाणी गिरीश महाजन यांना हाकलून लावले होते. त्या गावातील कार्यकर्तांचा अमोल कोल्हे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तीस वर्षात यांना तांड्यावर रस्ते करता आले नाही. पुढे बोलताना सतीश पाटील म्हणाले, जळगाव जिल्ह्यात जामनेर, चाळीसगाव, भुसावळ, जळगाव या चार जागा भाजपाच्या येणार नाहीत. राज्यात त्यांच्या ४६ जागा येऊ शकतात. शिंदे गटाच्या ही जागा जाणार आहे. हे टपरीवाले असल्याचे सांगतात, त्यांच्या कडे किती पैसा आहे हे सांगता येत नाही, कुंभ मेळाव्यात यांनी पैसे यांनी वाटून खाल्ले. युतीचे सरकार घालायचे आहे, महा विकास आघाडीचा आवाज आता वाढत आहे. पवार साहेब ज्या ठिकाणी जात आहेत. त्या ठिकाणी वातावरण बदलत आहेत.

## एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचा उद्घाटन सोहळा संपन्न




लातूर : महाराष्ट्र शासनाने आजच्या स्पर्धेच्या जगात आपल्या युवक युवतींना सक्षम बनवण्यासाठी काही महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र उभारण्यासाठी परवानगी दिली आहे. या योजने अंतर्गत एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात या शैक्षणिक वर्षापासून हे केंद्र कार्यरत होत आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन शुक्रवार, दिनांक २० सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता पंतप्रधान मा.श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते औनलाइन पध्दतीने करण्यात आले व सर्व उपस्थितांना त्यांनी या कौशल्य विकास केंद्र उभारण्याबाबतची संकल्पना विषद करून सांगितली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयीन शिक्षणासह व्यावसायिक कौशल्य विकसित करणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचेही त्यांनी यावेळी नमुद केले. या प्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री एकनाथ शिंदे, मा. उपमुख्यमंत्री श्री अजित पवार, मा.श्री देवेंद्र फडणवीस यांची समयोचीत भाषणे झाली.

हा संपूर्ण कार्यक्रमाचा थेट प्रक्षेपण सोहळा महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

या सोहळ्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव मा.श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव मा.श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष मा.श्री विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक मा.श्री प्रदिप दिंडीगावे, संचालक मा.श्री बाबुराव तरगुडे, प्राचार्य डॉ सुरेश हल्लाळी, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे प्रभारी प्राध्यापक विश्वजीत जाधव, तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये एआय- डेटा सायंटिस्ट आणि इलेक्ट्रीकल व्हेईकल टेस्ट इंजिनियर हे दोन अभ्यासक्रम राबवले जाणार असल्याचे प्राचार्य डॉ सुरेश हल्लाळी यांनी माहिती दिली.

## संविधान मंदिर शब्दा ऐवजी संविधान भवन शब्द वापरा..! नारायण बागडे

नागपूर/ प्रतिनिधी :- आपल्या भारताचे संविधान स्वतः धर्मनिरपेक्षतेची भाषा वापरते हे जगजाहीर आहे हे सर्व ज्ञान असुन मंदिर शब्द वापरणे म्हणजे संविधानातील धर्मनिरपेक्ष शब्दाचा घोर अपमानास्पद बाब आहे संविधानाच्या जनजागृतीसाठी सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच तांत्रिक विद्यालयात संविधान मंदिर बनविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला संविधानाचे जनजागृती हे स्वागतार्ह आहे परंतु मंदिर हे शब्द संविधानाला गालबोट लावून वेगळ्या मानसिकतेचे प्रतीक आहे मंदिर ऐवजी भवन हा शब्द वापरला पाहिजे असे मत आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी व्यक्त केले. राज्यातील ४३४ आयटीआयमध्ये संविधान मंदिराचे उद्घाटन मा. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते आँनलाईन पद्धतीने करण्यात आले आहे. दरम्यान ठाणे आयटीआयच्या कार्यालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नागपूरच्या प्रादेशिक कार्यालयात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि बारामती येथे उपमुख्यमंत्री अजित पवार हे या कार्यक्रमात सहभागी झाले आहेत. मंदिरात संविधान हे तत्व चुकीचे आहे संविधानात मंदिर, मस्जिद, चर्च, गुरुदार बोद्ध विहीर हे अनुच्छेद २५ हे सांगते संविधान निर्मात्याला सर्वभोम धर्मनिरपेक्षतेची गरज का भासली कि संविधान हा राष्ट्राचा प्रतिक असला पाहिजे आपल्या पुरोगामी राज्यातून हा संदेश चुकीचा ठरणार आहे असे आंबेडकरी विचार मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे म्हणाले यावर राज्यकर्त्यांनी लवकरच सुधारणा करून मंदिर ऐवजी संविधान भवन हा शब्द नमुद करून उद्घाटन करण्यात यावं जेणेकरून पुरोगामी राज्याची प्रतिमा मलिन होणार नाही.



दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# पेजर हल्ला

इस्त्रायलच्या मोसाद या गुप्तचर संघटनेने कथितपणे केलेल्या पेजर ब्लास्टची सध्या सर्वत्र चर्चा आहे. या हल्ल्याबाबत ज्याने वाचले किंवा ऐकले असेल त्यांची मती गुंग व्हावी असे हे आउट ऑफ बॉक्स थिंकिंग होते. त्याची झळ ज्यांना पोहोचली त्यांचे किती नुकसान झाले हे आता लगेचच कळणार नाही. केवळ मृतांचा आणि जखमींचा आकडा तेवढा समोर येऊ शकतो. तथापि, ज्या हिज्बुल्ला संघटनेला डोळ्यासमोर ठेवून हे नियंत्रित स्वरूपाचे स्फोट घडवून आणले ती संघटना किमान पाव शतक तरी मागे फेकली गेली आहे, असे मानले तर गैर ठरणार नाही. इस्त्रायलने जरी या हल्ल्याची अधिकृत जबाबदारी घेतली नसली तरी अशा प्रकाराचे यशस्वी हल्ले करण्याचा त्यांचा रेकॉर्ड आहे. अर्थात, इस्त्रायल किती हुशार आणि त्यांची गुप्तचर संघटना किती तरबेज आहे हा चर्चेचा विषय नाही. विषय आहे तो हल्ल्यांच्या बदलत्या स्वरूपाचा आणि तंत्रज्ञानाच्या घातक चेहर्याचा. त्याच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न केला तर इलेक्ट्रॉनिक गॅझेट अथवा उपकरण वापरणारी कोणीही व्यक्ती आज सुरक्षित आहे असे म्हणणे धाडसाचेच ठरावे. लेबनॉनमधील हिज्बुल्ला या संघटनेवर अत्यंत नियंत्रित आणि सुनियोजित असे हल्ले केले गेले. सामान्यत: फोन, पेजर आदी उपकरणांचा स्फोटक म्हणून वापर करता येतो हे काही हॉलिवूडपटांमध्ये विशेषत: बाँडपटांमध्ये अथवा टॉम क्रूसच्या चित्रपटांत दाखवले गेले आहे. अन्यथा एरव्ही सर्वसामान्य लोकांसाठी ही उपकरणे केवळ वापराचा भाग असतात. हिज्बुल्ला आणि इस्त्रायलचा संघर्ष तसा जुना. अलीकडच्या काळात इस्त्रायल गाझा भागात हमास या पॅलेस्टिनी संघटनेशी संघर्षात गुंतला असताना हिज्बुल्ला सक्रिय झाली. इस्त्रायलच्या उत्तर भागावर त्यांनी हल्ले सुरू केले. हिज्बुल्लाला इराणचे पाठबळ आहे आणि अमेरिकेने या संघटनेवर बंदी घातली आहे. आपल्या उत्तर भागातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी इस्त्रायलला बफर झोन तयार करण्याची निकड होतीच आणि मार खाऊन गप्प बसणे हा इस्त्रायलचा स्वभाव नाही. हिज्बुल्लाला ते तडाखा देणार हे निश्चितच होते. इस्त्रायलपासून सावधगिरीची पूर्ण खबरदारी हिज्बुल्लाकडूनही घेतली गेली होती. आपण कितीही आधुनिक स्वरूपाच्या फोनचा वापर केला तरी इस्त्रायल त्यात हस्तक्षेप करू शकेल याची त्यांना कल्पना असल्यामुळे त्यांनी परस्परांशी संवाद साधण्यासाठी अगदी कालबाह्य झालेल्या पेजर या उपकरणाची मदत घेतली होती. आपल्या सर्व कमांडर्सना त्यांनी पेजर्सचाच वापर करण्याचे निर्देश दिले होते. त्यांची ही रणनीती उत्तम होती. मात्र, अखेर पेजरही इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे. इस्त्रायल या क्षेत्रातील एक महाशक्ती आहे. हिज्बुल्लाला कोणत्या कंपनीकडून हे पेजर्स मिळतात हे हुडकून काढणे त्यांना फार अवघड नव्हते आणि त्यांनी तसेच करत तैवानच्या एका कंपनीच्या युरोपातील एका उत्पादकाचा शोध लावला. त्यानंतर इस्त्रायलने पुढे काय केले याचा तपशील अद्याप फारसा समोर आलेला नाही आणि कदाचित तो येणारही नाही. तथापि, काही माध्यमांच्या म्हणण्यानुसार, हिज्बुल्लाने पेजरची ऑर्डर दिल्यानंतर इस्त्रायलने प्रत्येक उपकरणाच्या बॅटरीमध्ये शक्तिशाली स्फोटके ठेवली. हे त्यांनी कुठे आणि केव्हा व कसे केले याचाही तपशील नाही. मात्र या प्रक्रियेत किमान काही महिने नक्कीच गेले असणार. हे सगळे पेजर हिज्बुल्लाच्या कमांडर्सकडेच जातील याची खबरदारी घेत एकाच वेळी स्फोट घडवून आणण्याची योजना त्यांनी तयार केली. पेजरवर काही संदेश आला की एक आवाज येतो याची ज्यांनी पेजर वापरले आहेत त्यांना कल्पना आहे. आवाज आल्यावर पेजर खिशातून काढून संदेश वाचला जातो. तो आवाज आल्यावरच एकाच वेळी स्फोट झाले. त्यात १२ जण ठार आणि तीन हजारपेक्षा अधिक जण जखमी झाल्याचा आकडा दिला गेला. मृतांची संख्या कदाचित वाढणारही नाही तथापि, अनेक जखमींनी या स्फोटांत आपली दृष्टी गमावली आहे. काही माध्यमांनी दिलेल्या बातम्यांनुसार हिज्बुल्लाचे किमान पाचशे कमांडर्सनी आपली दृष्टी गमावली आहे. यात इराणच्या एका राजदूताचाही समावेश आहे. हिज्बुल्ला ही तुलनेने फार मोठी संघटना नाही. पाचशे कमांडर अंध झाले असतील तर हा या संघटनेला जबर हादरा आहे. पुढची किमान २० ते २५ वर्षे त्यांना यातून सावरण्यासाठी जातील, कदाचित तेव्हाही ते पुन्हा उठू शकणार नाहीत. मोसादच्या एका माजी एजंटने दोन दिवसांपूर्वीच एक प्रतिक्रिया दिली आहे. कोणी विचार करू शकणार नाही अशी कृती करणे, जगाला जे दाखवायचे आहे ते दाखवणे आणि त्यानंतर गायब होणे व विशेष म्हणजे हल्ल्यामागे कोण आहे याचा कोणालाही सुगावा लागू न देणे हीच सगळ्यात मोठी रणनीती असते व तीच मोसादची स्टाइल आहे. आता हिज्बुल्लाशी संबंधित प्रत्येक जण अथवा त्यांचे पाठीराखे हे सगळेच कायमचे भयभीत राहतील, कोणत्या ठिकाणी इस्त्रायल त्यांना गाठू शकतो याची ते कल्पनाही करू शकणार नाहीत आणि स्वत:च्या बेडवर झोपायलाही घाबरतील. काही वेळा ठार मारण्यापेक्षा मृत्यूची भीती निर्माण करणे अधिक धोकादायक असते असे या एजंटचे म्हणणे आहे. ते केवळ इस्त्रायल-हमास-हिज्बुल्ला यांच्यापुरते सीमित नाही तर युद्धाचे हे बदलते स्वरूप सगळ्यांनी लक्षात घेण्यासारखे आहे. आता सैनिक युद्ध सीमेवर क्वचितच समोरासमोर होतील.

# पितृपक्षातील हाडपक्या(मस्कऱ्या) गणपती उत्सव हा प्राचीन परंपरेचा मोठा उत्सव.

पितृपक्षामध्ये धार्मिक कार्यक्रमासह पारिवारिक कार्यक्रम किंवा शुभकार्य करणे टाळले जाते.परंतु पितृपक्षाच्या काळातही प्रामुख्याने विदर्भात २६९ वर्षांपासून हाडपक्या (मस्कऱ्या) गणपती उत्सव साजरा करण्यात येतो.यामागे सुध्दा ऐतिहासिक परंपरा व संस्कृती आहे.नागपूरातील प्राचीन परंपरेतील ऐतिहासिक उत्सव म्हणजे 'हाडपक्या गणपती'. हा उत्सव गणेशेत्सव संपल्यानंतर सुरू होतो. नागपूरसह विदर्भातील अनेक जिल्ह्यांत हाडपक्या गणपती उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. हा गणपती उत्सव घरघुती स्वरूपाचा नसुन सार्वजनिक स्वरूपाचा असतो. पुर्वी मोठ्या प्रमाणात सार्वजानिक रीत्या हा उत्सव साजरा होत असत. परंतु कालांतराने आता काही मोजक्याच ठिकाणी हा उत्सव साजरा केला जातो. विदर्भात पितृपक्षाला हाडपक असेही म्हणतात. म्हणून हाडपकात बसविलेल्या गणपतीला 'हाडपक्या गणपती' असेही संबोधले जाते.राजे भोसले यांचे नागपूरात आगमन झाल्यानंतर अनेक प्रथा व परंपरांची सुरुवात झाली.भाद्रपद शुद्ध चतुर्थीला घरगुती गणेशोत्सवाला सुरुवात होते व याला मोठे सार्वजनिक स्वरूप सुध्दा दिले जाते आणि हा उत्सव दहा दिवस चालतो. घरगुती गणेश विसर्जन झाल्यानंतर जी पितृपक्षातील चतुर्थी येते त्या कृष्णपक्ष संकष्ट चतुर्थीला हाडपक्या गणपतीची स्थापना केली जाते. इ. स. १७५५ मध्ये नागपूरातील भोसले घराण्यातील तत्कालीन राजे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले उर्फ चिमनाबापू हे बंगालच्या स्वारीवर होते. बंगालवर ऐतिहासिक विजय मिळवून परत येत असताना कुळाचारी गणपतीचे विसर्जन झाले होते. त्यामुळे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले गणपतीउत्सव साजरा करू शकले नाही. त्यावेळी राजपुरोहित व अन्य विद्वानांसोबत चर्चा करून पितृपक्षातील भाद्रपद कृष्ण चतुर्थी (भाद्रपद संकष्टी चतुर्थी) ला गणपतीउत्सव साजरा करण्याचे ठरविले आणि त्यासोबत बंगालवर ऐतिहासिक विजय मिळविण्याच्या आनंदोत्सव सुद्धा सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले.तेव्हा पासून हाडपक्या गणपतीला सुरूवात झाली आहे.त्यामुळे याला विजयत्सोव सुध्दा म्हणता येईल.याकाळात लावण्या, नकला,भारूड, खडीगंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असे.यावेळी अनेक गंमतीजमतीचे कार्यक्रम होत असत त्यात थट्टा,मस्करी, नाटक खडी गंमत इत्यादींचा भडीमार होत असत म्हणजेच कार्यक्रमाच्या माध्यमातून मस्करी व्हायची यातुनच मस्कऱ्या हे स्थानीय बोलीभाषेतील नाव प्रचलित झाले आणि पितृपक्षातील गणपतीला 'मस्कऱ्या गणपती' नावाने प्रसिद्ध मिळाल्याचे सांगितले जाते.असे म्हणतात की लोकमान्य टिळकांनी ह्याच गणपती उत्सवाची प्रेरणा घेऊन भाद्रपद शुद्ध गणेश चतुर्थीला गणपती उत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले आणि यातूनच त्यांनी स्वातंत्र्याचा लढा उभा केला.हाडपक्या गणपती उत्सवाचा मुख्य सोहळा नागपूरातील भोसले राजवाडा, महाल येथे आयोजित करण्यात येते.या उत्सवाला आज २६९ वर्षे पूर्ण होत आहेत म्हणजेच ही ऐतिहासिक परंपरा आहे.श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले यांच्या काळात हाडपक्या गणपतीची स्थापन केली जात होती. तीच परंपरा आजही आपल्याला पहायला मिळते. त्याच प्रकारची मूर्ती स्थापन करण्यात येते.त्याकाळी लावण्या,भारूड,पोवाडे, खडी गंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जायचे.परंतु आता कालांतराने वेगवेगळे मनोरंजनात्म कार्यक्रम आले यात आर्केस्ट्रा, सुगम संगीत, नाटक, नवीन पिढीला आनंद देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजित करण्यात येते. हा उत्सव सलग दहा दिवस साजरा करण्यात येतो. या दरम्यान महाप्रसादचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो व भाद्रपद कृष्ण द्वादशीला गणपती उत्सवाची सांगता होते आणि हाडपक्या गणपतीचे विसर्जन करण्यात येते. यामुळे लक्षात येते की भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सणाला व उत्सवाला अत्यंत महत्व असते.मग तो कोणत्याही धर्माचा उत्सव असो यातुनच आपली जडणघडण व विविधता दिसून होते,आपण परीपक्व होतो व आपल्या परिवाराला संस्कृतीतून चांगली चालना मिळते.यामुळेच आज संपूर्ण जग भारतीय संस्कृतीकडे आकर्षित झाल्याचे दिसून येते.ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे.गणपती बाप्पा मोरया!

**********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर) मो.नं९९२१६९०७७९,
नागपूर

# आत्मनिर्भर भारत एक दिवास्वप्न!

काही शब्द असे आहेत,असतात की, ते खूपच प्रभावशाली व मनाला भाळणारे, स्फृर्ती,उत्साह निर्माण करणारे असतात. त्या शब्दाचे महत्त्वही तसेच असते,, तो शब्द जर एखाद्या नावासमोर लावला तर ते नाव खूपच प्रभावशाली बनते. अशाच एका शब्दाचा वापर आपल्या पंतप्रधानांनी केला आहे. तो म्हणजे आत्मनिर्भर भारत

आत्मनिर्भर म्हणजे कोणावरही अवलंबून न राहता, स्वयं प्रकाशीत असणे.पुर्णपणे विकसीत,प्रगतशील असणे,म्हणजे आत्मनिर्भर!मग बोललो म्हणजे झालो काय आपण आत्मनिर्भर. तर नाही त्यासाठी आमच्याकडे जी साधने,संसाधने,पायाभुत सुविधा पाहिजे त्या आहेत का, हे पाहावे लागेल. तपासावे लागेल.आणि त्या नसतील तर आम्ही आत्मनिर्भर कसे होणार!

आमच्या देशात तर दगड उचलला तेथे समस्या आहे. एवढ्या समस्या निर्माण झाल्या आहेत, असे वाटते अजून १००वर्ष या समस्या मिटतात की नाही. काय सांगाव!आमचा देश समस्याचा देश आहे की काय असे वाटते.

कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील शिक्षणाच्या प्रगतीवर अवलंबून असते.

कारण शिक्षणाने माणूस ज्ञानी,विद्वत्तापुर्ण,चिकीत्सक विचारी, बुध्दिमत्ता कौसल्य,अध्यापण,विवेकशील, शहाणपण,स्पष्ट संवाद,मानव संसाधन विकास,तंत्रज्ञान विकास,मनाची निर्भयता या सर्व गोष्टी मिळतात.म्हणुन जीवनात शिक्षण अंत्यत महत्त्वाचे आहे.खऱ्याअर्थाने शिक्षणातुनच माणूस आत्मनिर्भर होतो.

म्हणून महापुरुषांनी शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे.महात्मा फुले म्हणतात प्राथमिक शिक्षणासोबतच उच्च शिक्षण सुध्दा सरकारने सक्तीचे करावे.

शिक्षणाने अज्ञान,अंधश्रध्दा दुर केल्या जातात,आणि विकासाचा, प्रगतीचा मार्ग मोकळा होतो.

पण शिक्षणच जर नसेल तर गरीबी,बेकारी,बेरोजगारी,अज्ञान ,अंधश्रध्दा वाढते.आणि मग माणूस आत्मनिर्भर न होता,परावलंबी राहतो.गरीबी वाढण्याचं कारणच शिक्षणाचा अभाव आहे. आणि गरीबीमुळे आर्थिक अडचणी निर्माण होतात, त्यामुळे शिक्षण घेता येत नाही,अशी परिस्थिती होते.

आपल्या देशात खेडी जास्त आहेत,खेड्यातील सर्वच गोरगरीब लोकाची मुले सरकारी (जि.प.)शाळेत शिकतात.२०१७ च्या शिक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार २०राज्यामधील ६५.२%मुले सरकारी शाळेत शिकतात.शालेय नोंदणी चे प्रमाण ९३ ते ९५%आहे.त्यांचा शिक्षणाचा दर्जा मात्र सुधारला नाही.८वी शिकणाऱ्या मुलाला मराठी वाचता येत नाही,अशी परिस्थिती आहे.आता त्याच शाळा बंद करणे चालू झाले आहे.मग ती गोरगरीब मुले आत्मनिर्भर होणार का?

उच्च शिक्षण घेणाऱ्यांच प्रमाण किती, फक्त २५% आहे. जागतीक विद्यापीठाच्या २०२० च्या जागतिक सर्वेक्षणात असे आढळले की भारतात एकही विद्यापीठ दर्जेदार स्वरुपाचे नाही,की पहिल्या १०च्या यादीत असेल.३३व्या स्थानी आपला क्रमांक आहे.

२००७ मध्ये प्रधानमंत्री असतांना मनमोहन सिंग यांनी एक खंत व्यक्त केली होती,आपली विद्यापीठे व्यवस्था अनेक भागामध्ये दुरावस्थेच्या अवस्थेत आहेत.देशातील जवळपास निम्म्या जिल्ह्यामध्ये उच्च शिक्षणातील प्रवेश अत्यंत कमी आहेत.आपली जवळपास २/३विद्यापिठे आणि आमची ९०%महाविद्यालये खालीलप्रमाणे रेट केलेली आहेत.गुणवत्तेच्या मापदंडांवर सरासरी....मला काळजी वाटते की अनेक राज्यामध्ये कुलगुरुच्या नियुक्त्यासह विद्यापिठाच्या नियुक्त्याचे राजकारण केले गेले आहे.आणि त्या जाती आणि जातीय विचाराच्या अधीन झाल्या आहेत.पक्षपातीपणा आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारी आहेत.

भारतात जेवढ्या काही शैक्षणिक,उच्च शैक्षणिक संस्था आहेत, त्या राजकीय लोकांच्या आहेत.किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या आहेत. कोण्या गरीब माणसाची, शेतकऱ्यांची,बेरोगार तरुणांची दिसणार नाही.

जागतीक पातळीवर दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत भारत १३९ व्या स्थानावर आहे.याचे कारण भारतात असलेली गरीबी व लोकसंख्या.

पाच देशामिळुन बनलेली (ब्रिक्स)संघटना आणि २० राष्ट्र मिळुन बनलेली जी-२० संघटना. राष्ट्रामधील भारत सर्वात गरीब देश गणल्या गेला. कारण भारताचे दरडोई उत्पन्न सर्वात कमी आहे.

भारत देश जगात तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था जरी बनला तरी गरीब राहु शकतो,असे काही जागतिक स्तरावरील तज्ञांचे म्हणणे आहे.

ऑक्सफॅमच्या मते भारतात १%लोकांकडे ७३%संपत्ती आहे.६७० दशलक्ष सर्वात गरीब लोकांचा समावेश असलेल्या नागरीकांच्या संपत्तीत १%वाढ झाली आहे.(ऑक्सफॅम हि ब्रिटिश देशाने स्थापन केलेली एक स्वतंत्र संस्था आहे,ती जगातील गरीबी निर्मुलनावर लक्ष केंद्रित करते.)

आजही भारतातील बिहार,झारखंड,ओरीसा,छत्तिसगढ,मध्यप्रदेश,उत्तरप्रदेश,उत्तराखंडया राज्यात ६०%लोक गरीब आहेत.खरच आम्ही आत्मनिर्भर म्हणण्याइतपत विकसीत आहोत काय? तर नाही.

आजही भारतात ४०%लोकांकडे ३%शेती आहे.आणि १०%लोकांकडे ५४%शेती आहे. किती फरक आहे. आत्मनिर्भर राष्ट्राची अशी विषमतावादी ओळख असते का? आत्मनिर्भर,विकसित राष्ट्राची ओळख तिथल्या शेवटच्या घटकापर्यंत राहणाऱ्या माणसापर्यंत शिक्षणासोबतच सर्व आवश्यक पायाभूत सुविधा पोहचणे होय?

आपल्या देशात दर्जेदार शिक्षणच तर शेवटच्या घटकापर्यंत अजुनही पोहचले नाही.मग आम्ही आत्मनिर्भर कसे ?

जगात दर्जेदार उच्च शिक्षणाच्या सोयी मुळे तेथील तरुण आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेमुळे नवनवीन संकल्पना सादर करुन नवनवीन टेक्नोलॉजी निर्माण करत आहेत. जगात टेक्नोलॉजीच्या बाबतीत खूप मोठी क्रांती, प्रगती(बदल) घडवून येत आहे. ती प्रगती केवळ एका क्षेत्रापुरती मर्यादित नाही तर कृषी,औद्योगीक,वैद्यकीय,शिक्षण सर्वच क्षेत्रात आपल्याला दिसत आहे.

इस्त्रायल हा शेती विकसीत उद्योग करणारा एक असा देश आहे की त्या देशात सर्वात कमी पाऊस पडतो. तरी सुद्धा तो देश कापूस उत्पादनात अग्रेसर आहे. असे म्हणतात की तेथील लोक एकरी ४० ते ५०क्विंटल कापसाचे उत्पादन घेतात.भारतात कपाशी पिकांवर चार पाच वर्षापासून बोंडअळी येऊ राहिली, तेही नाही दुर होऊ राहिली,याला कारण संशोधनाचा,तंत्रज्ञानाचा अभाव,हिच जर समस्या इस्त्रायल मध्ये असती तर, त्यांनी तात्काळ त्यावर संशोधन केले असते.

जापान मध्ये ९९% लोक शिक्षीत उच्च शिक्षित आहेत.चार टक्के लोकच तेथे बेरोजगार आहेत.म्हणुन तो देश प्रगत आहे. त्यांनी कितीतरी टेक्नोलॉजी विकसित केली .की तो देश आजच्या घडीला २०५० मध्ये जगत आहे. अमेरिका,ब्रिटन,फ्रांन्स,जर्मनी,हे देश तर बर आत्मनिर्भर आहेतच, असे देश असतात आत्मनिर्भर! तंत्रज्ञानाने तंत्रज्ञान चालवले जाते या देशात, आम्ही फक्त शब्दाचाच वापर करत आहोत. विश्वगुरु भारत आत्मनिर्भर भारत!

भारत तर कृषी प्रधान देश आहे.भारतात आतापर्यंत ८०% शेती सिंचनाखाली यायला पाहिजे होती. ती ४७% आहे. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नाही. त्यासाठी आंदोलन करावे लागते. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी शेतकऱ्यांसाठी लागू केल्या जात नाही. अजून शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी पाहिजे तसे रस्ते नाहीत, पाऊस जर चालू राहिला तर रस्त्याअभावी शेतकऱ्याचा माल शेतातच राहतो. अशी परिस्थिती आहे. शासन रस्ता मंजूर करील, त्यावेळी शेतात जाण्यायेण्यासाठी रस्ता होईल हि वाट त्याला पाहावी लागते. बेरोजगार तरुणांना रोजगार मिळण्याची वाट पाहावी लागते, गरीबाला आपली गरीबी कमी करण्यासाठी शासन काही मदत देईल काय याची वाट पाहावी लागते. कारण तशी परिस्थिती निर्माण झाली आहे.मग इथला शेतकरी,भूमीहीन मजुर, बेरोजगार,गरीब आत्मनिर्भरआहे का?

देशाचे आर्थिक उत्पन्न वाढवायचे असेल तर देशात हजारो एकर शेती ई क्लास, एफ क्लास,सिलींगची, जे काही पडिक पडलेली असेल.ती जमीन भूमीहीन, गरीब गरजु लोकांना वहितीकरीता देणे आवश्यक आहे, त्यामुळे त्यांच्या हाताला काम तर मिळेलच, शिवाय आर्थिक विकास होऊन गरीबी कमी व्हायला मदत होईल, .त्यांचे उत्पन्न पण वाढेल व सोबत देशाचे पण उत्पन्न वाढेल, आणि ते आत्मनिर्भर होण्याच्या मार्गावर स्वार होतील.

योजना वाढवल्या म्हणजे आर्थिक विकास होत नाही. अर्थव्यवस्थेची गती वाढवायची असेल तर देशातील गुंतवणूक वाढली पाहिजे, पायाभूत सुधारणा झाल्या पाहिजे, भक्कम बँकींग व्यवस्था झाली पाहिजे यातुन विकास दर ठरवला जातो. रोजगार कमी झाला तर गुंतवणूक कमी, त्यामुळे बचतीचा दर कमी, म्हणजे अर्थव्यवस्थेची गती कमी.असे काही अर्थतज्ज्ञांचे म्हणणे आहे.

आता सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण,शिक्षणाचे खाजगीकरण,देशातील गोरगरीब मुलांना शिक्षण घेता येईल का? शिक्षणच घेता आले नाही,तर हाताला काम मिळणार नाही. मग आम्ही आत्मनिर्भर कसे होणार!

भारतात आज ३३मिलीयन तरुण बेरोजगार आहेत.१मिलीयन म्हणजे १०लाख,पहा किती कोटी तरुण बेरोजगार आहेत.

भारतात १४०कोटी लोकसंख्या आहे. १कोटी ७६लाख नोकरी करणारे लोक आहेत.(२०११-१२ च्या सर्वेक्षण नुसार) किती मोठी तफावत आहे.

सुप्रीम कोर्टाचे एक न्यायाधीश एम. सी. छागला म्हणतात या देशाचे संविधान एवढे सुंदर आहे,की राज्यकर्त्यांनी त्या संविधानाप्रमाणे राज्यकारभार केला असता तर भारत देश पृथ्वीवरील स्वर्ग निर्माण झाला असता.

संविधानाप्रमाणे जर कारभार केला असता, तर केव्हाचे आम्ही आत्मनिर्भर झालो असतो, अच्छे दिन पण आले असते आणि भारत विश्वगुरु पण बनला असता.

भारतात ज्यादिवशी सरकारी शाळा दर्जेदार होणार,त्यात शिकणाऱ्या गोरगरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळणार, ९०%च्या वर बेरोजगार तरुणांना रोजगार मिळणार, आणि ६०%च्या वर उच्च शिक्षिताचे प्रमाण वाढणार, शेतकऱ्यांच्या समस्या मिटणार,त्यादिवशीआम्ही आत्मनिर्भर होण्याच्या मार्गावर स्थित होऊ. अन्यथा आत्मनिर्भर भारत एक दिवास्वप्न ठरेल!

**********

विनोद सरदार
फुले आंबेडकर विद्वत सभा
मो.नं.९६८९८४७११५

# अवघड कामगिरी

'एक देश, एक निवडणूक' या विधेयकावर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विधेयक सादर केले जाणार आहे. सरकारकडून विशेषत: नेतृत्व करणार्या भारतीय जनता पार्टीकडून 'एक देश, एक निवडणूक' कसे आवश्यक आहे, त्याचे काय फायदे देशाला होतील हा तर्क मांडला जातो आहे. त्यात सगळ्यात महत्त्वाचे सांगितले जाते आहे ते म्हणजे हा निर्णय झाला तर सातत्याने होणार्या निवडणुकांमधून देशाची सुटका होईल. दुसरा तर्क असा मांडला जातो आहे की सरकारच्या तिजोरीवरील बोजा कमी होईल आणि तिसरा महत्त्वाचा तर्क म्हणजे धोरणात सातत्य राखता येईल. निवडणुका जाहीर झाल्यामुळे योजनांना जो ब्रेक लागतो तो लावण्याची गरज भासणार नाही. व्यवहारी दृष्टिकोनातून यात चुकीचे काहीच नाही. त्यातून झाला तर लाभच होणार आहे. मात्र, काही प्रश्नही उपस्थित होत आहेत, त्याची उत्तरे सरकारला शोधावी लागतील. संख्याबळानुसार जर ते गेले तर त्यांना स्वबळावर हे विधेयक संमत करून घेणे अशक्य आहे. विरोधी पक्षांना सोबत घेतले तरच त्यांना काही करता येऊ शकते. तथापि, विरोधी पक्ष सरकारसोबत येण्याची शक्यता अत्यंत दुर्मिळ आहे.सगळ्यात मोठ्या विरोधी पक्षाचे म्हणजे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपला इरादा बोलून दाखवला आहे. काँग्रेसचेच एक ज्येष्ठ आणि कायदेतज्ज्ञ असलेले नेते पी. चिदंबरम यांनीही कालच आपला विरोध जाहीर केला आहे. काँग्रेससोबत असणार्या अन्य पक्षांची भूमिका त्याच प्रकारची असणार आहे. त्यामुळे हे विधेयक संमत करून घेणे सरकारपुढे हिमालय उचलून आणण्याएवढे कठीण असणार आहे. 'एक देश, एक निवडणुकी'चा अभ्यास करण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. समितीचा अहवाल सादर झाला आहे. आपल्या लोकशाहीला आणखी चैतन्यशील आणि समावेशक बनवण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे समितीला आणि सरकारलाही वाटते.पंतप्रधानांनीही सोशल मीडियावर तशीच प्रतिक्रिया दिली आहे. पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेणे. त्यानंतर दुसर्या टप्प्यात १०० दिवसांच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जाव्यात, असे समितीने सुचवले आहे. एकाचवेळी निवडणुका घेण्यासाठी संविधानात दुरुस्ती करण्याची शिफारस कोविंद समितीने केली आहे. प्रामुख्याने दोन घटनादुरुस्ती कराव्या लागणार आहेत आणि तेथेच सगळे अडणार आहे. त्याचे कारण म्हणजे कोणतेही घटना दुरुस्ती विधेयक संमत करून घेण्यासाठी दोन तृतीयांश मतांनी ते विधेयक संमत होणे गरजेचे असते. किंवा असेही म्हणता येते की सभागृहात उपस्थित असलेल्या एकूण सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने मतदान केले पाहिजे.लोकसभेतील एकूण सदस्य संख्या ५४३ आहे. विधेयकाच्या बाजूने ३६२ मते पडणे आवश्यक आहे. आजच्या घडीला भारतीय जनता पार्टीची स्वत:ची सदस्यसंख्या २४० आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील मित्रपक्षांची संख्या धरून हा आकडा २९३ पर्यंतच जातो. विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीकडे २३४ संख्याबळ आहे. याचा अर्थ विधेयक संमत करून घेण्यासाठी सरकारला विरोधी पक्षांच्या मदतीची गरज भासणारच आहे. तुलनेने राज्यसभेत सरकारची स्थिती चांगली आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे ११३ आणि नियुक्त केलेले ६ असे संख्याबळ त्यांच्याकडे आहे, तर विरोधकांचे संख्याबळ ८५ आहे. मात्र या सभागृहातही विधेयक संमत करायचे झाल्यास १६४ सदस्यांचा पाठिंबा असणे क्रमप्राप्त आहे.दोन्ही सभागृहातून किमान शंभर सदस्य अनुपस्थित अथवा तटस्थ राहिले तर दोन तृतीयांश बहुमताने विधेयक संमत करवून घेता येईल. मात्र, मोदी सरकारच्या तिसर्या कार्यकाळात ही बाब सर्वथा अशक्य वाटते. कोविंद समितीने ६२ राजकीय पक्षांकडून मत मागवले होते. एकूण ४७ राजकीय पक्षांनी आपले मत मांडले. यापैकी ३२ जणांनी 'एक देश, एक निवडणूक'ला पाठिंबा दिला तर १५ पक्षांनी विरोध केला. यावर्षी मे-जून महिन्यात लोकसभा निवडणूक झाली होती.

# प्रशासनाच्या आश्वासनानंतर सुमित डोंबे यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आमरण उपोषण स्थगित



लातूर :- चाकूर पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी २७ -७- २०२४ रोजी त्यांच्या सहकाऱ्यांसह वंचित बहुजन आघाडीचे सुमित डोंबे यांना मारहाण झाल्याची तक्रार देत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू होते आज अखेर सकाळी १० वाजता. पोलीस निरीक्षक नरवडे पोलीस निरीक्षक बावकर यांच्या उपस्थितीमध्ये संबंधितांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपोषण सोडण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव संतोष सूर्यवंशी, जिल्हा महासचिव रोहित सोमवंशी, लातूर तालुका अध्यक्ष सुनील कांबळे, लातूर शहराध्यक्ष सचिन गायकवाड, शहर महासचिव आकाश इंगळे आदींची उपस्थिती होती.

# रामासामी पेरीयार यांनी दक्षिणेत परिवर्तनवादी चळवळीची मूळे मजबूत केली. प्रा.डॉ. अशोक नारनवरे

लातूर :-- महात्मा ज्योतीराव फुले यांच्यानंतर महाराष्ट्रातील सत्यशोधक पुढाऱ्यांनी अस्पृश्यांबद्दल फारशीआस्था दाखविली नाही. महात्मा फुल्यांची सत्यशोधक चळवळ महाराष्ट्रातल्या सत्यशोधकांनी स्वार्थासाठी वापरली. त्यामुळे महाराष्ट्रातील ब्राम्हण - ब्राम्हणेतर चळवळ क्षीण झाली. मात्र दक्षिण भारतामध्ये ई.व्ही. रामासामी पेरीयार यांनी अस्पृश्यतेविरूद्ध रान पेटविले, आर्य -ब्राम्हण आणि मनुवाद्यांविरूध्द टोकाचा संघर्ष केला. तामिळनाडू मध्ये त्यांनी परिर्वनवादी चळवळीचा पाया मजबूत केला. म्हणून आजही दक्षिण भारतात मनुवादी राज्यकर्त्यांना संधी मिळत नाही. असे प्रतिपादन सुप्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ. अशोक नारनवरे यांनी केले आहे.

लातूर येथील 'जी- २४ ' च्या वतीने प्रकाशनगरमधील 'प्रबोधन ' मध्ये ई. व्ही. रामासामी नायकर यांच्या जयंती निमीत्त संपन्न झालेल्या अभिवादन कार्यक्रमात प्रा.नारनवरे बोलत होते. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात



ते पुढे म्हणाले की, उत्तर भारतात आर्य संस्कृती तर दक्षिण भारतात अनार्य संस्कृती अस्तीत्वात होती. त्यामुळेच भारतामध्ये सांस्कृतिकदृष्ट्या दोन भाग दिसून येतात.ई. व्ही. रामासामी पेरीयार यांनी चालविलेल्या परिवर्तनवादी चळवळीची मूळे दक्षिण भारतात खोलवर रुजली आहेत. ती आजही मजबूत आहेत. म्हणूनच आज संपूर्ण भारतात ५ज % मधील आरक्षण मिळविण्यासाठी लोकांमध्ये संघर्ष चालू असताना तामिळनाडू मध्ये मात्र ६७ % आरक्षण बिनदिक्तपणे चालू आहे. याचे सर्व श्रेय रामासामी यांनाच जाते. असेही प्रा.नारनवरे यांनी सांगीतले.

यु.डी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ' जी -२४ ' चे कार्यकर्ते प्रा.डॉ.हर्षवर्धन कोल्हापूरे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.डॉ.मारोती गायकवाड यांनी केले तर नरसिंग घोडके यांनी आभार मानले. यावेळी 'अनिसं ' चे कार्याध्यक्ष माधव बावगे,प्राचार्य आर.डी. निटूरकर, रामराजे आत्राम, इंजि. श्रीधर शेवाळे, प्रा.माकणीकर, नारायण कांबळे, शिरीष दिवेकर, राजेंद्र हजारे, संजीवकुमार सूर्यवंशी,इंजि. राहूल लोंढे आदी मान्यवरांसह अनेकजण उपस्थित होते.

# होलार समाजाच्या मागण्यासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर आमरण उपोषणाचा इशारा



लातूर :- अखिल भारतीय होलार समाजाच्या वतीने या समाजाच्या विविध मागण्यासाठी सोमवार तारीख २३ सप्टेंबर पासून मुंबई येथील आझाद मैदानावर या संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रणजीत दादा ऐवाळे पाटील हे आमरण उपोषणास बसणार असून त्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी सर्व समाज बांधवांनी आझाद मैदानावर हजर राहण्याचे आवाहन मराठवाड्यातील युवा नेते चंद्रशेखर केंगार (सी. के .अण्णा )यांनी केले आहे महाराष्ट्रातील होलार समाज वर्षानुवर्ष शासन दरबारी उपेक्षीला गेला आहे या समाजाच्या हिताकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी समाजबांधव एकवटले असून या समाजाच्या शैक्षणिक आर्थिक व राजकीय सद्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी अभ्यास आयोग नेमण्यात यावा या समाजाच्या जातीच्या नोंदी चुकीच्या झाल्या आहेत त्या दुरुस्ती करण्यासाठी समिती गठन करण्यात यावी होलार समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे जोपर्यंत विकास महामंडळ स्थापन होत नाही तोपर्यंत संत रोहिदास व चर्मोद्योग महामंडळावर या समाजाचा प्रतिनिधी नेमण्यात यावा अशा विविध मागण्यासाठी अमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला असून एक दिवस जातीसाठी होलार समाजाच्या अस्तित्वासाठी समाज बांधवांनी आझाद मैदानावर आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त भव्य चित्रकला स्पर्धा

लातूर मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा व मुक्ती संग्राम लढ्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान तरुण पिढीला ज्ञात व्हावे म्हणून स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रयराव शिवणगीकर सार्वजनिक वाचनालय द्वारा मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त श्री लाल बहादुर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर येथे शुक्रवारी भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.स्पर्धेचे उद्घाटन विनोद चव्हाण यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालाजी साळुंखे होते तर अमोल देशमुख, माझं घर प्रकल्पाचे प्रमुख शरद झरे, मुख्याध्यापक वळसंगे, राजेश्वर हरणाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा विनामूल्य आयोजित करण्यात आली होती. भारतीय स्वातंत्र्यलढा, मराठवाडा मुक्ती संग्राम, स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक, देशभक्ती व हुतात्मा स्मारक आदी विषय स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना दिले होते. या स्पर्धेला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सुमारे १०० विद्यार्थीनी स्पर्धेमध्ये भाग घेतला.

# पुणे विमानतळाला संत तुकाराम महाराजांचे नाव

पुणे : प्रतिनिधी पुण्यातील नवीन विमानतळाचे काम चांगले झाले असून या नवीन विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्याबाबतच्या प्रस्तावाला मंजुरीसाठी प्रयत्न करण्यात येतील, असे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले. जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, उपस्थित होते. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. आपला इतिहास, संस्कृती आणि वारसा यादृष्टीने महाराष्ट्राचे एक वेगळेपण असून संत-महापुरुषांच्या ग्रंथांनी, ओव्यांनी आपले जीवन समृद्ध आणि संपन्न केले आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग हे भक्तिमार्ग असून या मार्गाने लाखो वारकरी पायी जातात. वारक-यांच्या सुविधेच्या अनुषंगाने दोन्ही पालखी मार्गाकरिता सुमारे १२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, असे ते म्हणाले येत्या डिसेंबरपर्यंत पुणे शहर आणि जिल्ह्यात १ लाख ५० हजार कोटी रुपयांची कामे सुरू करण्यात येतील. याशिवाय पुणे ते सातारा महामार्गाचा नवीन विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करून कामे करण्यात येतील. मुंबई- बंगळुरू या द्रुतगती महामार्गाचे काम हाती घेण्यात आले असून पुण्याच्या वर्तुळाकार मार्गाला याचा लाभ होणार आहे, यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, असे नमूद केले.



उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात वारीचे महत्त्व मोठे आहे. देहू, आळंदी आणि पंढरपूर या तीर्थक्षेत्राकडे संपूर्ण राज्याचे लक्ष असते. श्री विठ्ठलाच्या दर्शनाकरिता वर्षानुवर्षे, शतकानुशतके अडचणीचा सामना करून वारकरी श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आशेने पंढरपूरकडे मार्गक्रमण करीत असतात. वारीत पोहोचू न शकणारे भाविक आपापल्या देशातून दर्शनाचा लाभ घेतात, त्यामुळे आपली वारी आता वैश्विक झाली आहे. वारक-यांना योग्य प्रकारच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत, रस्ते रुंद झाले पाहिजेत, पालखी मार्ग वेगळा करून त्या मार्गावर सर्व प्रकारच्या सोयी असल्या पाहिजेत यादृष्टीने काम होत आहे. वारक-यांना पालखी तळावरही विविध सोयी-सुविधा देण्याकरिता त्याठिकाणी भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

# संविधान मंदिर की संविधान दालन..?

चारशेहून अधिक आय.टी.आय कॉलेजेसमध्ये सध्या संविधान मंदिर सुरू होत आहे. तसं भारताच्या उपराष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन झालं. प्रत्येक व्यक्तीचा धर्म आपापल्या ठिकाणी श्रेष्ठ आहेच परंतु या धर्मनिरपेक्ष देशात संविधानाचं मंदिर उभारावसं वाटणं हे हास्यास्पद आहे. संविधान सदन, संविधान सभागृह हे का उभारावस वाटलं नाही ? अर्थातच हा वैचारिक पातळीवर कमकुवत पाया आहे. प्रामुख्याने लोकसभेच्या निकालानंतर अचानक हे सरकार संविधान प्रेमी होत असल्याचं आपण पाहतोय. त्यात संविधान दिन जवळ येतोय. वास्तविक पाहता गेल्या काही वर्षात संविधानाच्या मूल्यांना कसं वेगवेगळ्या माध्यमातून पायदळी तुडवलं याची आपल्याला कल्पना आहे. मुलत: भारताचं संविधान हा जगायचं कसं सांगणारा एक सशक्त ग्रंथ आहे. त्याचं विशिष्ट मंदिरीकरण करणं म्हणजे संविधानाच्या मूल्यांना नख लावण्याचा प्रकार आहे. आज संविधानाचं मंदिर झालं तर इतर धर्मियांना आपापल्या पद्धतीने धार्मिक स्वरूप द्यावसं वाटेल. त्यातून होणारे परिणाम हिंसक राहतील. सर्व धर्मांना एकत्र ठेवणाऱ्या संविधानाचं भविष्य आणि भवितव्य धोक्यात असल्याचं आपल्याला जाणवतं. आपण वेळीच याबाबत विविध माध्यमातून संविधानिक भाषेत बोललं पाहिजे. या संविधान मंदिराची रचना आपण पाहिली तर लक्षात येतं की घरात असलेल्या गाभाऱ्याचं स्वरूप काहीसं यातून स्पष्ट होतं. अर्थातच संविधान पूजनाचा ग्रंथ नाही हे संविधानिक पदावर असलेल्यांच्या लक्षात आलं नसेल का ? आलं असेल तर मग हा खोडसाळपणा की अशी कृती केल्यानंतर लोकांच्या काय प्रतिक्रिया येतात हे खडा टाकून चाचपणी करणे आहे का ? आपण अपयशी होत आहोत अशी जाणीव झाल्यानंतर निवडणुकीसाठी कोणत्या गोष्टीचा आधार घ्यावा ? कशाच राजकारण करावं ? याच उत्तर आपण मागितल पाहिजे. या अशा प्रयोगातून संविधानातल्या मूल्यांचा प्रचार प्रसार बाजूला राहून त्याला धार्मिक स्वरूप येईल अशी शक्यता नाकारता येत नाही. संविधानाचं मंदिर ऐवजी संविधान दालन करणे प्रचंड गरजेच आहे. संविधान प्रक्रियेची एकूण माहिती, भारताच्या संविधान प्रस्ताविकेतील मूल्यांची माहिती, सरनाम्याचा आराखडा ते अगदी लोकशाही किती महत्त्वाची आहे अशा स्वरूपाच्या महत्त्वाच्या बाबी या दालनात येणे आत्यआवश्यक आहे. सर्वच लोकांनी आपापल्या ठिकाणी संविधान दालनाची सुरुवात करून हे संविधान मंदिर नसून संविधान दालन असल्याचं कृती कार्यक्रम करून राबवायला हवं. ज्या कॉलेजेसमध्ये हे संविधान मंदिर उभारण्याचे काम सुरू आहे त्यापैकी अनेक प्राध्यापक, प्राचार्य, विद्यार्थ्यांनी या गोष्टी लक्षात आणून दिल्या. मात्र त्यांचं ऐकून घेण्यात आलं नाही हे लोकशाहीचं अपयश आहे. सरते शेवटी लोकांची ताकद महत्त्वाची आहे. समर्थन अथवा विरोध हा लोकांच्या व्यक्त होण्यातूनच दिसणार आहे. शालेय पातळीवर या संविधानात नेमकं काय आहे याचा प्रचार प्रसार होऊन अधिक प्रमाणात शिकायला मिळावं यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. प्रामुख्याने अभ्यासक्रमात समावेश व्हायला हवा. अशा प्रकारचे मंदिर उभारून बौद्धिक विकास होणार नाही. कारण संविधानाला हात जोडून निघून जाणं हे आपण किती अडाणी आहोत याचे उत्तम उदाहरण राहील. तर्कशुद्ध पद्धतीने विचार करून सर्वांना समाविष्ट करेल अशा पद्धतीचं संविधान दालन असणं गरजेचं आहे. संविधान मंदिर कधीही होणे नाही.
*लोकशाही बळकटीसाठी सामूहिक आवाजच बदल करेल.लोकशाहीच्या बळकटीसाठी सामूहिक आवाजातून चिंतन - मंथन झालेच पाहीजे..!

के. एच. हनवते (पत्रकार)

# मांजरा साखर कारखान्यातर्फे ऊस पीक परिसंवाद

लातूर : प्रतिनिधी देशभरात साखर उद्योगातील नावलौकिक असणा-या लातूरच्या विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना विलास नगर लातूर यांच्यावतीने राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख यांच्या सूचनेनुसार कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतक-यांसाठी ऊस उत्पादन खर्च नियंत्रणात ठेवून उसाच्या टनेज मध्ये वाढ करण्यासाठी कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये असलेल्या बाभळगाव, सलगरा (बु)चिंचोली (ब) गादवड, भादा व आलमला ठिकाणी ठिकाणी ऊस पीक परीसंवादाचे आयोजन करण्यात आलेले आले असून या उस पिकं परिसंवादाचा शुभारंभ लातूर ग्रामीणचे आमदार तथा जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते २४ सप्टेंबर रोजी बाभळगाव, ग्रामपंचायत सभागृह येथे सकाळी ८.३० वाजता होणार आहे. शेतक-यांना ऊस पिक उत्पादन घेत असताना पूर्व मशागत, बेणे निवड, लागवड पद्धत, बेणे प्रक्रिया, कीड रोग व तणांचे व्यवस्थापन, खत व पाणी व्यवस्थापन, अंतर मशागत व खोडवा व्यवस्थापन इत्यादी बाबी व ऊस उत्पादनावर परिणाम करणा-या असतात त्याबाबीचे योग्य व्यवस्थापन करून उत्पादनात वाढ करणे हा ऊस पीक परीसंवादाचा उद्देश आहे.

# आवळा देऊन कोहळा काढण्याचा प्रयत्न

नांदेड : विशेष प्रतिनिधी माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांचे समर्थक असलेले मारोतराव कवळे गुरुजी हे उमेदवारी मिळावी यासाठी पालकमंत्र्यांना भेटण्यासाठी गेले होते. परंतु पालकमंत्र्यांनी भेट नाकारल्यामुळे त्यांचे खासगी सचिव डॉ.निशिकांत देशपांडे यांची भेट घेऊन ते परतले. त्यामुळे मारोतराव कवळे गुरुजींचा आवळा देऊन कोहळा काढण्याच्या प्रयत्नाची चर्चा रंगली आहे. त्यामुळे उमेदवारी मिळण्याच्या इच्छेने पक्षात दाखल होणा-यांसाठी हा एक धडा असल्याचे सांगण्यात येते. माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांचे समर्थक असलेले उमरी तालुक्यातील नेते मारोतराव कवळे गुरुजी काही दिवसांपूर्वीच भारतीय जनता पक्षात दाखल झाले. त्यानंतर नायगाव मतदारसघातून उमेदवारी मिळावी यासाठी त्यांनी खा.चव्हाणांना साकडे घातले. परंतु पालकमत्र्यांची भेट घेतल्याशिवाय उमेदवारी निश्चित होणार नाही, हे लक्षात आल्यानंतर त्यांनी आपल्या समर्थकांसमवेत थेट मुंबई गाठली. पालकमंत्री महाजन यांच्याकडे गेल्यानंतर मात्र त्यांच्या पदरी निराशाच आली. पालकमंत्र्यांनी त्यांना भेट नाकारली. त्यामुळे आपल्या समर्थकांमध्ये वेगळा संदेश जाऊ नये यासाठी पालकमंत्र्यांचे खासगी सचिव डॉ. निशिकांत देशपांडे यांची भेट घेत त्यांना बुके देऊन कवळे गुरुजी परतले. यामुळे त्यांची कृती दुधाची तहान ताकावर भागवण्याचा प्रकार असल्याची प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. आपल्या



उमेदवारीबाबत पालकमंत्र्यांना गळ घालावी, असा संदेश तर कवळे गुरुजींना द्यायचा नसावा ना, याबाबत चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे तत्कालिन काळात नांदेडचे उपजिल्हाधिकारी म्हणून डॉ.निशिकांत देशपांडे यांनी केले. या काळात सर्वसामान्यांसह कार्यकर्ते, पदाधिकारी यांचे प्रश्न, कामे वेळेत निकाली काढण्यात त्यांचा पुढाकार होता. यामुळे आजही ते सर्वांनाच आपले वाटतात. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील कोणतेही पदाधिकारी, राजकारणी पालकमंत्र्यांकडे गेले तर ते डॉ. निशिकांत देशपांडे यांना भेटल्याशिवाय परतत नाही. आपले कोणतेही काम असो ते डॉ. निशिकांत देशपांडे यांना सांगितल्यास मार्गी लागते, अशी प्रत्येकाची भावना आहे. भारतीय जनता पक्ष हा संघाच्या शिस्तीवर चालणारा पक्ष आहे, याची कवळे गुरुजींना माहिती नसावी. त्यांच्याप्रमाणेच अन्य पक्षातील खा.चव्हाण यांचे समर्थक उमेदवारीच्या इच्छेने भाजपमध्ये दाखल होत आहेत. कवळे गुरुजींना आलेला हा अनुभव उमेदवारी इच्छुकांसाठी संदेश असावा, असे मानले जात आहे. भारतीय जनता पक्षातील शिस्त नव्यांना अंगिकारावी लागेल, हे स्पष्ट आहे. परंतु आवळा देऊन कोहळा काढण्याचा मारोतराव कवळे यांचा प्रयत्न मात्र फसला हे मात्र खरे! या भेटीप्रसंगी योगायोगाने उपस्थित असलेले कवळे गुरुजींचे स्पर्धक बालाजी बचेवार यांच्यासह चैतन्य बापू देशमुख, ॲड.किशोर देशमुख व बाळू खोमणे आदी त्यांच्यासोबत होते.

# रक्त कर्करोग जागरूकता महिना, काय आहेत सामान्य लक्षणे

कर्करोग म्हणजे शरीराच्या कोणत्याही अवयवातील किंवा ऊतींमधील पेशींचा असामान्य प्रसार, जीन उत्परिवर्तनामुळे प्रभावित होते ज्यामुळे कर्करोगाला अमरत्व, वाढीचा फायदा आणि नैसर्गिक प्रतिकाराविरूद्ध प्रतिकारशक्ती मिळते. हे जनुक उत्परिवर्तन अनेकदा जीवनशैली किंवा दुर्गुणांमुळे कर्करोगाच्या वाढीच्या संभाव्यतेत वाढ होते. काही जनुके कर्करोगासाठी वारशाने मिळालेली जंतू-रेषेतील उत्परिवर्तन असतात परंतु बहुतेक सोमॅटिक असतात ज्याचा अर्थ कुटुंबातील कोणालाही कर्करोगाने बाधित न होता जगण्याचा भाग म्हणून प्राप्त केले जाते. डॉ. अभय भावे, हेमेटोलॉजिस्ट, लीलावती रूग्णालय मुंबई यांनी अधिकमाहिती दिली आहे. ल्युकेमिया, मायलोमा आणि लिम्फोमा हे काही प्रकारचे रक्त कर्करोग आहेत जे अस्थिमज्जा (हाडांच्या आच्छादनाच्या आतील जागा) मध्ये उद्भवतात. शरीरातील जवळजवळ कोणताही घन अवयव कर्करोगाने प्रभावित होऊ शकतो.

लिम्फोमामुळे मान, काखेत किंवा मांडीचा सांधा तसेच छाती किंवा उदर पोकळीमध्ये लिम्फ नोड्स वाढतात आणि अस्थिमज्जावरही परिणाम होऊ शकतो. ल्युकेमियामुळे रक्तातील लाल पेशी आणि प्लेटलेट्स कमी होतात आणि मायलोमामुळे हाडांचे दुखणे विशेषतः पाठदुखी आणि फ्रॅक्चर होऊ शकते. कोणत्याही प्रकारच्या कर्करोगामुळे रोगप्रतिकारशक्ती कमी होते आणि त्यामुळे रुग्णाला संसर्ग होण्याची शक्यता असते ज्यामुळे आरोग्याची गुणवत्ता आणि जीवनशैलीशी तडजोड होऊ शकते आणि काहीवेळा जीवाला धोका निर्माण होतो. ताप, थंडी वाजून येणे सतत थकवा येणे, अशक्तपणा जाणवणे भूक न लागणे, मळमळ वजन कमी होणे रात्री घाम येतो हाडे/सांधेदुखी ओटीपोटात अस्वस्थता डोकेदुखी श्वास लागणे वारंवार संक्रमण खाज सुटणे किंवा त्वचेवर पुरळ येणे मान, अंडरआर्म्स किंवा मांड्यांवर सूज येणे निदान करणे आवश्यक रक्त कर्करोगाच्या यशस्वी उपचारांसाठी लवकर निदान आवश्यक आहे. निदानासाठी रक्त चाचण्या, अस्थिमज्जा तपासणी, इमेजिंग स्कॅन, लिम्फ नोड बायोप्सी आणि अनुवांशिक चाचणी केली जाऊ शकते. सुरुवातीच्या टप्प्यात केलेल्या उपचारांमुळे काही प्रकरणांमध्ये बरे होऊन चांगले परिणाम दिसून येतात. प्रगत अवस्थेवर देखील उपचार केले जाऊ शकतात परंतु पुन्हा पडण्याची शक्यता जास्त असते. उपचारांमध्ये केमोथेरपी, रेडिएशन थेरपी, स्टेम सेल प्रत्यारोपण किंवा लक्ष्यित उपचारांचा समावेश असू शकतो. विशिष्ट दृष्टीकोन रक्त कर्करोगाच्या प्रकारावर आणि टप्प्यावर अवलंबून असतो.

# फ्रिजमध्ये २९ वर्षांच्या तरुणीचे ३० तुकडे आढळले

बंगळूरू : दिल्लीतील श्रद्धा वालकर प्रकरणाच्या आठवणी अद्यापही आपल्या स्मरणात असतील. यातच आता बंगळुरूमधील मल्लेश्वरममधून एक अशीच घटना समोर आली आहे. येथे एका २९ वर्षीय तुरुणीच्या मृतदेहाचे ३० तुकडे करून ते फ्रीजरमध्ये ठेवल्याचे आढळून आले आहे. पोलिसांनी शनिवारी यासंदर्भात माहिती दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साधारणपणे दोन आठवड्यांपूर्वीच तरुणीची हत्या करण्यात आली आहे. तिची ओळख पटली असून तपासाच्या कारणास्तव अधिक माहिती शेअर करण्यात आलेली नाही. स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ती तीन महिन्यांपूर्वीच या फ्लॅटमध्ये भाड्याने राहण्यासाठी आली होती. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला आहे. तरुणीच्या हत्येनंतर तिच्या मृतदेहाचे तुकडे करण्यात आल्याचे अधिका-यांचे म्हणणे आहे. याप्रकरणीही संशयितांचा शोध सुरू आहे. महत्वाचे म्हणजे, या हत्येप्रकरणात तरुणीच्या परिचित व्यक्तीचा हात असू शकतो, अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. श्रद्धा वालकर प्रकरणाची आठवण ताजी झाली या प्रकरणाने दिल्लीतील श्रद्धा वालकर हत्या प्रकरणाची आठवण ताजी झाली आहे. त्या प्रकरणात एका तरुणाने श्रद्धाची हत्या करून तिच्या मृतदेहाचे तुकडे केले होते आणि ते जंगलात फेकून दिले होते. आता, बंगळुरूमध्ये घडलेल्या या घटनाने समाजातील सुरक्षितता आणि महिलांवरील गुन्ह्यांसंदर्भात चिंता वाढवली आहे. पोलिस या प्रकरणाचा कसून तपास करत असून आवश्यक माहिती मिळवली जात आहे.

# गळत असलेल्या पानगाव येथील चैत्य स्मारकाची चौकशी करण्याचे मुख्यमंत्री - उपमुख्यमंत्र्यानी दिले लातुरच्या जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

**तात्पुरती दुरुस्ती न करता स्ट्रक्चरल ऑडिट करून ट्रस्ट आणि ठेकेदारावर गुन्हे दाखल करण्याची आंबेडकरी अनुयांयींनी केली होती मागणी**

रेणापुर/ प्रतिनिधी :- पाच सहा वर्षापूर्वीच कोट्यावधी रुपये खर्चुन बांधण्यात आलेल्या पानगाव येथील चैत्य स्मारक पावसाळ्यात गळत असल्याने अभिवादना करिता येणाऱ्या अनुयांयीच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे.या करिता इमारतीची तात्पुरती दुरुस्ती न करता स्ट्रक्चरल ऑडिट करून स्मारकाचे इमारतीतील अभिवादन (दर्शन) बंद करून संबंधित ट्रस्टवर आणि ठेकेदार यांची चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी आंबेडकरी अनुयांयीनी राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री आणि लातुरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे गुरुवार (दि.१२ ) रोजी निवेदनाव्दारे केली होती.या निवेदनाची दखल घेवन मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री यांनी लातुरच्या जिल्हाधिकाऱ्यांना चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

मौजे पानगाव तालुका रेनापुर येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी आहेत. दरवर्षी सहा डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाराष्ट्रातूनच नव्हे तर शेजारील आंध्र प्रदेश,कर्नाटक, तेलंगणा राज्यातूनही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थीला अभिवादन करण्याकरिता लाखो आंबेडकरी अनुयायी येत असतात.१९५६ पासून अस्थी ठेवले आहेत तेथे स्मारक उभे न करता दुसरीकडेच ज्या ट्रस्टच्या ताब्यात अस्थी नाहीत त्या ट्रस्टने शासनाची फसवणुक करून निधी मिळवुन निकृष्ट दर्जाचे स्मारक बांधकाम केलेले आहे. ज्यावर्षीही इमारत बांधून पूर्णत्वास आली त्यावर्षीच्या पहिल्या पावसापासून आज पर्यंत ती इमारत चहू बाजूने गळत आहे,त्यामुळे इमारतीमध्ये पाणी साचत आहे. इमारतीच्या भिंती शेवाळ युक्त झाले आहेत,भिंतीला तडे गेले आहेत,भिंतीचा आणि छताचा गिलावा निखळून पडत आहे यामुळे इमारत कोसळण्याचा धोका अधिक निर्माण झाला आहे.सदरील इमारतीमध्ये भगवान गौतम बुद्धांची भव्य मूर्ती ठेवण्यात आली आहे. बाहेरून इमारत भव्य दिव्य आणि सुंदर दिसत असल्यामुळे राज्यभरातून आंबेडकरी अनुयायी पर्यटक या इमारतीला भेट देतात, तर महापरिनिर्वाण दिन एका एका वेळी वीस ते पंचवीस हजार अनुयांयी एकत्रित या इमारतीत वंदना,अभिवादना करिता जमतात त्यामुळे दुर्दैवी घटना घडवून मोठ्या प्रमाणात जीवित हानी ही होऊ शकते. आणि जर तशी दुर्दैवी घटना घडलीच तर त्याची जबाबदारी संबंधित ट्रस्ट घेणार काय ? ठेकेदार घेणार काय ? किंवा शासन-प्रशासन जबाबदारी घेणार काय ? मे.कृष्णा कंट्रक्शन कंपनीने इमारतीचे बांधकाम केले त्यांनी सिमेंट रेती सळई कुठल्या दर्जाची वापरली हे पाहणे संबंधित ट्रस्टची जबाबदारी असते ती जबाबदारी त्यांनी योग्यरित्या बजावली नाही त्यामुळे सदरील इमारतीस तडे गेले आहेत,पावसात चहुबाजूने इमारत गळत आहे,गिलाव्याच्या भिंतीचे आणि छताचे पापुद्रे निखळून पडत आहेत म्हणजेच इमारतीचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिसत आहे. यामुळे ही इमारत कधीही कोसळून मोठी जीवित हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.यामुळे संभाव्य जीवित हानी टाळण्याकरिता चैत्य स्मारक इमारतीची तात्पुरती दुरुस्ती न करता स्ट्रक्चरल ऑडिट करून स्मारकाचे इमारतीतील अभिवादन (दर्शन) बंद करून संबंधित ट्रस्ट ची आणि ठेकेदार यांची चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावे अन्यथा आंबेडकरी अनुयांयीना रस्त्यावरची आणि न्यायालयीन लढाई लढावी लागेल असा इशारा राज्याचे मुख्य मंत्री,उपमुख्यमंत्री यांना देण्यात आला होता.या निवेदनाची राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी तात्काळ दखल घेतली असून त्यांनी जिल्हाधिकारी लातुर यांना गळत असलेल्या पानगाव येथील चैत्य स्मारकाची चौकशी करण्याचे आदेश दिले असल्याने आंबेडकरी अनुयांयी कडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# शतकवीर रकतदाते अनिल डुंगरवाल यांचे ११० वे रकतदान



लातूर :- थोर जैन संत स्व.जीवराजजी म. सा.यांच्या ३१ व्या पुण्यतिथी निमित्त श्री वर्धमान श्र्वेतांबर जैन श्रावक संघ,लातूर यांच्या वतीने सद्गुरू जीवराज भवन येथे आयोजित रक्तदान शिबिरात शतकवीर रक्तदाते अनिल फुलचंदजी डुंगरवाल यांनी ११० वे रक्तदान केले.अनिल डुंगरवाल यांनी आतापर्यंत अनेकांना रक्त दानासाठी प्रेरित केले असून ५० हून अधिक रक्तदान शिबिरे घेतली आहे.अनेक गरजू रुग्णांना त्यांनी रक्तदान केले आहे.त्यांच्या या कार्याबद्दल सीए तेजमल बोरा,सीए सुनील को चेटा,विपीन कोचेटा, रविंद्र दर्डा,डॉ.दीपक गुगळे,राजेश डुंगरवाल,प्रदिपजी राठी,सूर्यप्रकाश धूत,पुखराज दर्डा व अनेकांनी अभिनंदन केले आहे

# १०८ रुग्णवाहीका चालकांना आरटीओकडून सन्मान पत्र देऊन केला गौरव



लातूर : प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्थात आरटीओ लातूर यांच्याकडून महाराष्ट्र रुग्णवाहीका १०८ वाहन चालक संघटना संलग्न महाराष्ट्र राज्य कोअर कमिटीचे सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. वाहन चालक दिना निमित्त प्रादेशिक परिवहन कार्यालय लातूर येथे सिद्वेश्वर जाधव, उमाकांत गायकवाड, फुलचंद मुगळे, संजय होळसंबरे, मधुकर हनुमंते,अबरार शेख, शाहरुख शेख, गणेश दंडिमे, संजय मुसांडे या सर्व रुग्णवाहिका चालकांना महाराष्ट्र रुग्वाहीका १०८ वाहन चालक संघटना संलग्न महाराष्ट्र राज्य कोअर कमिटीच्या सन्मान पत्राचे वितरण प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण व कर्मचाऱ्याच्या हस्ते करण्यात आले. यावेळी १०८ रुग्णवाहिका चालक व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# आखिल भारतीय हिंदु खाटीक समाजाच्या युवा जिल्हाध्यक्षपदी शंकर नागभूजंगे यांची निवड



लातूर : अखिल भारतीय हिंदू खाटीक समाज युवा प्रकोष्ठच्या लातूर युवा जिल्हाध्यक्षपदी शंकर नागभुजंगे यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय हिंदू खाटीक समाजाचे नेते केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री भारत सरकारचे वीरेंद्रजी खाटीक, राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार डॉ. भोलेसिंग बडगुजर, प्रदेश अध्यक्ष रमेश जाधव यांनी शंकर नागभुजंगे यांची ही निवड केलेली आहे. त्यांनी व सहकारी समाज बांधवानी युवा जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी आणि विश्वास माझ्यावर टाकलात. त्याला तडा न जाऊ देता पूर्ण क्षमतेने न्याय देण्याचा मी प्रयत्न करिन. अशी प्रतिक्रिया नूतन युवा जिल्हाध्यक्ष शंकर नागभुजंगे यांनी व्यक्त केली आहे.

# आंबेडकरी चळवळीतील बौध्द युवक राजू कापसे यांची जातीयवाद्यांनी शीर कापून केले हत्याकांड.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- आंबेडकरी चळवळीचं केंद्र असणाऱ्या छत्रपती संभाजी नगर,औरंगाबाद येथे पुरोगामी महाराष्ट्राला व मानवतेला काळीमा फासणारी घटना घडणे ही अत्यंत लाजीरवाणी बाब आहे. दिनांक १२ सप्टेंबर २०२४ च्या वृत्तपत्रातील बातमी वाचली आणि अंगाचा थरकाप उडाला.इतकी भयानक ही घटना काळीज चिरून गेली. मयत राजू किसन कापसे वय ३५ वर्ष रा.विजय नगर औरंगाबाद या आंबेडकरी चळवळीतील बौध्द युवकाची हत्या मारेकऱ्यांनी इतक्या निर्दयपणे केली की ते शब्दात सुध्दा मांडता येत नाही.कारण मुंडकं कापून शरीराच्या बाजूला फेकणे हे माणसातील सैतानाचे काम आहे.हे एका व्यक्तीचे काम नसून समूहाचे काम आहे.या मागे मोठं षडयंत्र असल्याचं दिसून येते.

पुरोगामी महाराष्ट्राला फुले,शाहु,आंबेडकर यांचे विचार सांगणाऱ्या यवकाची ही हत्या आहे.मुळात राजू कापसे हा अत्यंत गरीब परिस्थिती मधून आपल्या संसाराचा उदरनिर्वाह करत होता.तो असंघटित नाक्यावरील पेंटर काम करणारा असंघटित कामगार होता.या मधून आता कुठं तरी त्याची आर्थिक परिस्थिती सुधारत होती. त्याच्या राहणीमानात सुद्धा बदल झाला होता.आंबेडकरी विचारधारेशी प्रामाणिक असल्याने तो समाजकार्यात हिरीरीने भाग घ्यायचा यामुळे त्याने वेगवेगळ्या जाती धर्माची मित्र मंडळी सुद्धा जोडली होती. या मधूनच तो भीमजयंती,शिवजयंती मोठ्या उत्साहाने करायचा.समाजकार्यात सुद्धा समोरच असायचा या परिसरात तो चांगलं असंघटित कष्टकरी कामगारांचे आंबेडकरी विचारधारेमुळेच नेतृत्व करायचा.पण जातीयवादी मानसिकतेचा कपटीपणा त्याला समाजालाच नाही. त्याचे काम आणि समाजिक कार्य तो करीत राहिला. असे येथील नागरिक सांगतात.तसेच मयत राजू कापसे यांची गरोदर असलेली पत्नी जीवाचा आतंक करून सांगत आहे.दुपारून राजुला फोन आला आणि तश्याच गडबडीत तो मित्राच्या फोन ने बाहेर गेला.आणि नंतर त्याच्या हत्या झाल्याची बातमी मिळाली.कसं वाटत असेल त्या गरोदर पत्नीला आणि सात वर्षाच्या मुलाला ही सर्व घटना काळीज चिरणारी आहे.संबधित अधिकारी न्याय देतीलच कारण त्यांचा संविधावर विश्वास आहे.त्यांच्या मागेपुढे कोणीच मोठा राजकीय नेते कार्यकर्ता नाही.आहे तो फक्त असंघटित कष्टकरी मजूर आणि बाबासाहेबांनी लिहिलेला कायद.असे या घटने मधून दिसून येते.

छत्रपती संभाजी नगर औरंगाबाद हे आंबेडकरी चळवळीचे केंद्र आहे. या शहरात असा प्रकार घडणे ही अत्यंत लाजीरवाणी बाब आहे.या शहरातील माणूस सुरक्षित नाही हे यावरून दिसून येते.सर्वसामान्य माणूस येथे भयभीत झाला आहे. गाव पातळीवर जेव्हा असे हत्याकांड होतात.तेव्हा गावा पासून शहरा पर्यन्त आंबेडकरी चळवळतील काशकरी मजूर पेटून उठतो.याचा उद्रेक अख्ख्या महाराष्ट्रात होतो. हे विसरून चालणार नाही काही आंबेडकरी नेत्यांनी कार्यकर्त्यांनी तसा आवाजही उठविला आहे. म्हणून प्रशासन या कुटुंबाला न्याय देईल पण अश्या घटनेला दाबण्यासाठी जातीय मानसिकता पिढ्यान पिढ्या पासून हत्या झालेल्या व्यक्तीच्या चारित्र्याचे धिंडवडे उडवत असते.म्हणून येथील शासनाने मानवतेला काळीमा फासणाऱ्या या प्रकरणाची सत्यता लक्षात घेवून मयत राजू कापसे यांच्या मारेकऱ्याला कठोरतील कठोर शिक्षा देवून.भयभीत झालेल्या या कापसे कुटुंबाचे पुनर्वसन करावे. या कुटुंबाला संरक्षण देऊन सहकार्य करावे.तसेच अत्यंत गरीब असलेल्या या कुटुंबाला तात्काळ पन्नास लाख रुपये आणि त्यांच्या निराधार झालेल्या गरोदर पत्नीला शासकीय सेवेत नोकरी देवून सहकार्य करावे. तसेच महाराष्ट्रातील तमाम मानवतावादी व आंबेडकरी चळवळीने या प्रकरणात जातीने लक्ष घालून मयत राजू कापसे यांची गरोदर असलेली पत्नी व सात वर्षाच्या मुलाला न्याय मिळवून द्यावा.असे प्रकार या महाराष्ट्रात घडणार नाहीत या साठी दक्ष राहावे. जातीयवाद प्रबळ होत आहे. हे मात्र यामधून दिसून येते.शासनाने या कुटुंबाला न्याय देऊन योग्य सहकार्य करावे.अन्यता हा असंघटित कष्टकरी रस्तावर उतरला तर प्रचंड जन आंदोलन झाल्या शिवाय राहणार नाही.



# मागीतल्याने मिळणार नाही,संघर्षा शिवाय पर्याय नाही. महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृति समिती

मुंबई / विशेष प्रतिनिधी : - महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील गलथान कारभार उजेडात आणण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले आहेत.आपण अनुभवतोय की एकेका केंद्रावर हजारो कामगार उपस्थित असतात परंतु त्याबद्दलचे नियोजन सरकारी दप्तरी नसल्यामुळे कामगारांवर अन्याय सुरू आहे. दुसरीकडे बोगस नोंदणी जोरदार सुरू आहे. बोगस आरोग्य तपासणी,शिबिरांच्या नांवें अक्षरशः लुटमार सुरु आहे. बांधकाम कामगार नसतांना ही त्यांची नोंदणी केली जाते. त्यांच्या पदरी आर्थिक लाभ मिळत आहेत. खऱ्या कामगारांची कागद पत्रे चुकीचे ठरवून नांव नोंदणी रद्द केली जात आहे. तर राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आयोजीत केलेल्या नांव नोंदणी शिबिरात विना विलंब नोंदणी केली जात आहे.त्या विरोधात तक्रार करण्याची न्याय व्यवस्था खालून वर पर्यन्त नाही. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळेस आचारसंहिते मध्ये ऑनलाईन कामकाज बंद करण्यात आले. तेव्हा आपण निवडणूक आयुक्त मां. चोकलिंगंम यांची भेट घेतली होती.चर्चा केली होती. आपण इथेच थांबलो नाही तर बांधकाम कामगार संघटना कृती समितीच्या वतीने महाराष्ट्राचे कामगार आयुक्त डॉ. एच पी तुंबोड व सहाय्यक राज्य आयुक्त मा.शिरीन लोखंडे यांनाही भेटलो. बांधकाम कामगार कायद्याची अंमलबजावणी आणि किमान वेतन कायद्याचे अंमलबजावणी व्हावी अशी मागणी करण्यात आलेली होती. आत्ता पुन्हा विधानसभा निवडणुक आल्या तेव्हा पुन्हा कामकाज बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

इमारत बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनांचा महामंडळाचा पैसा,भांडे वाटप,जाहिरात,आणि आचासंहितेपूर्वी बोनस जाहीर करून लुटला जाणार आहे.मध्यान भोजन योजनेचे तीन तेरा कसे वाजले हे आपण अनुभवले. सध्या भांड्याचा संच व सुरक्षा संच वाटप चालू आहे. या सर्व टेंडर पास झाल्यानंतर कोट्यावधी पैश्याची उलाढाल होते.कल्याणकारी योजनेची सर्व ठिकाणी जोरदार जाहिरात बाजी चालू आहे. यावर किती खर्च होतो?. कामगार आयुक्त कार्यालयामार्फत कामगार संघटनांना विश्वासात घेतले जात नसल्यामुळे सर्व प्रश्न तयार झालेले आहेत.जे एजेंट असतील त्यांची कामे जोरदार होतात. कामगार संघटनांची काम करण्याची पद्धत शासनानेच ठरवून दिलेली आहेत. त्यानुसार चालते. म्हणूनच जर बांधकाम कामगारांना न्याय मिळायचा असेल तर त्यांच्या लाभाचे वाटप कामगार संघटनांना विश्वासात घेऊन करणे आवश्यक आहे. मंडळाच्या योजनांचे सोशल ऑडिट झाले पाहिजे. कारभार पारदर्शी असला पाहिजे. नूतनीकरणाचे नियम बदलले पाहिजेत.अर्ज एका पंधरा दिवसात किंवा महिन्यात निकाली काढले पाहिजेत.या साठी कामगारांचा आवाज बुलंद झाला पाहिजे. रस्त्यावरच्या लढाई सोबत न्यायालयिन लढाई साठी पुरावे आणि कागद पत्रे एकत्रित केली पाहिजेत.हे सर्व विषय विचारात घेऊन आपण २८ सप्टेंबर २०२४ तारखेला एक दिवसाचे शिबिर आयोजित करीत आहोत.मा.ऍड.सुधा भारद्वाज या शिबिराला उपस्थित राहून मार्गदर्शन करतील.दिनांक:- २८ सप्टेंबर,वेळ:- सकाळीं १० ते ४,स्थळ:- विश्व कमल हॉटेल, रूम नं.११९,पहिला मजला,शे.का.प.ऑफिस,सेक्टर ११, सीबीडी बेलापूर.पूर्व -नवी मुंबई.रेल्वे स्टेशन समोर.अधिक माहितीसाठी :- सागर तायडे ९९२०४ ०३८५९,प्रदीप शिंदे ९८९२३ ६७९८३,बिलाल खान ९९५८६ ६०५५६,विनिता बाळेकुंद्री ८०९७०६०७५२ यांच्याशी संपर्क साधावा.आपण सहभागी होण्यासाठी नांव नोंदणी केली तर व्यवस्था करण्यात अडचण येणार नाही.कारण आपण असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी कामगारांसाठी काम करतो,आपल्याकडे साधने आणि आर्थिक स्त्रोत नाही.हे लक्षात घेऊन बांधकाम कामगार संघटना पदाधिकारी यांनी सहकार्य करावे.कारण मागीतल्याने मिळणार नाही,संघर्षा शिवाय पर्याय नाही.

# प्रत्येक विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गौरव विभाग प्रमुखाचे उत्कृष्ट अधिकाऱ्याचा सन्मान

**मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या हस्ते गौरवपत्र प्रदान**







लातूर/प्रतिनिधी:सन २०२३ -२४ या वर्षात केलेल्या अतुलनीय व उल्लेखनीय कामाबद्दल प्रत्येक विभागातून उत्कृष्ट काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याला व सर्व विभाग प्रमुखातून एका विभाग प्रमुखास उत्कृष्ट काम केल्याबद्दल मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या हस्ते गौरवपत्र देऊन सन्मानित आले.

भांडार विभाग प्रमुख भांडारपाल बालाजी काशिनाथ शिंदे तसेच संतोष लाडलापूरे यांना उत्कृष्ट स्वीय सहाय्यक म्हणून सन्मानित करण्यात आले. नंदा देवपुंजे,श्रीमती एस.एस.पोटे,एस.एस. धायगुडे यांना उत्कृष्ट शिक्षक तर आस्थापना विभागातून अभिमन्यू पाटील,असलम शेख, संकीर्ण पेन्शन विभागातून अनिकेत हापसे,लेखा विभागातून लहू तापकिरे, मालमत्ता विभागातून दीपक पवार,अग्निशमन विभागातून आनंद शिंदे, लेखा परीक्षण विभागातून पंडीत लोहारे,वाहन विभागातून वाहन चालक हक्कानी शेख,राजकुमार सोंत,जन्म -मृत्यू विभागातून सतिश कांबळे,झोन क्र.ए,बी,सी व डी वसूली विभागातून एक कर निरिक्षक व एक वसूली लिपीक म्हणून प्रदीप जोगदंड,दीपक कांबळे,प्रकाश खेकडे, अली चाऊस,गुलाब शेख, ज्ञानदेव पर्वते,तहेमीत शेख,गफार शेख,भांडार विभागातून दया नंदकिशोर,नागरी सुविधा केंद्रातून चाऊस महमद नासर,संगणक विभागातून करीम शेख , विधी विभागातून प्रभाकर चव्हाण,पाणी पुरवठा विभागातून जलील शेख भुयारी गटार विभागातून अक्तर शेख,घरकुल योजना विभागातून हणमंत जाधव,आरोग्यं विभागातून डॉ.श्याबमा जाधव,लखन कांबळे व झोन ए,बी,सी,डी मधील लाईट विभागातून नजीर पठाण,दत्ताल येलशेट्टे, जोहर शेख,अनिल उबाळे,मैनोद्दीन शेख यांना आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या हस्ते गौरवपत्र देण्यात आले.

यावेळी मनपाचे अतिरिक्त आयुक्त शुभम क्यातमवार,उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्या लेखापरिक्षक तथा उपायुक्त श्रीमती कांचन तावडे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे,सहाय्यक आयुक्त मंजूषा गुरमे,निर्मला माने,अजित ढोपे, खदीर शेख आदींसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमांचे सुत्रसंचलन जनसंपर्क अधिकारी रुक्मानंद वडगावे यांनी केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE